माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये**
**प्राप्त झालेले द्वितीय अपील**

**अपील क्रमांक : ३१०/२०२२**

**अपिलार्थी** – श्री. संजय भिमरावजी भगत

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी,**
**पंचायत समिती, हिंगणघाट, जि. वर्धा**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, हिंगणघाट, जि. वर्धा**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १२.०३.२०२४**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा / आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २८.०९.२०२१ | ३०.०९.२०२१ | ०८.११.२०२१ | २९.११.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दि.२८.०९.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "सचिव, ग्राम पंचायत, टाकळी (निधा) यांच्या बोगस कामकाजाबाबत दि. ३०.०३.२०२१ रोजी सादर तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबत" माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.०९.२०२१ रोजीच्या पत्रातील प्रतिलिपीमध्ये, "प्रस्तुत माहिती अर्ज हा श्री. आर. डी. कांबळे, विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, हिंगणघाट यांच्याकडे मानीव जन माहिती अधिकारी म्हणून कलम ५ (४) अन्वये तसेच कलम ६ (१) (ख) याप्रमाणे माहिती देण्याकरिता अग्रेषित करण्यात आला आहे", असे अपिलार्थीस कळविले. तदनंतर अपिलार्थी यांनी **दि. ०८.११.२०२१** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "मागितलेली माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करून प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.११.२०२१ रोजी सुनावणी घेवून, "श्री. संजय भीमराव भगत यांना आज

रोजी चौकशी अहवालाची प्रत पणे मागे पुढे १ ते १० उपलब्ध करून देण्यात आली असून संबंधितास चौकशी अहवालाची प्रत प्राप्त झाल्याची पोच दफ्तरी ठेवण्यात आली आहे", असे नमूद करून अपील निकाली काढले आहे.

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)नुसार आयोगाकडे **दि. ३१.०१.२०२२** रोजी "अपूर्ण, चुकीची व असमाधानकारक माहिती मिळाल्याबाबत" असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दि. ०३.०२.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दि. १२.०३.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी, श्री. संजय भगत उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, हिंगणघाट, सौ. निलिमा उगेमुगे उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, , पंचायत समिती, हिंगणघाट, श्री. के. बी. अंजने उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरून असे निदर्शनास आले की, अपिलार्थी, श्री. संजय भिमरावजी भगत यांनी दि. २८.०९.२०२१ रोजी दाखल केलेल्या जोडपत्र अ नुसार, सचिव, ग्राम पंचायत, टाकळी (निधा) यांच्या बोगस कामकाजाबाबत दि. ३०.०३.२०२१ रोजी सादर तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती मागितली आहे. यावर मागितलेली माहिती विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, हिंगणघाट यांच्याशी संबंधित असल्याचे नमूद करून तत्कालीन जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, हिंगणघाट यांनी दि. ३०.०९.२०२१ रोजी कलम ५ (४) अन्वये मानीव जन माहिती अधिकारी यांच्याकडे हस्तांतरित केली व त्यांनी कलम ६ (१) (ख) अन्वये माहिती देण्याविषयी सूचनादेखील दिलेली आहे. जन माहिती अधिकारी स्तरावर याबाबतीत विहित मुदतीत कुठलीच माहिती प्रदान न केल्यामुळे अपिलार्थी, श्री. भगत यांनी दि. ०८.११.२०२१ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे.

प्रस्तुत प्रथम अपील अर्जावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगणघाट येथे सादर केलेल्या दि. ३०.०३.२०२१ रोजीच्या तक्रार अर्जावर चौकशी झाली नसल्यामुळे माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. परंतु सुनावणीदरम्यान श्री. कांबळे, विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, हिंगणघाट यांनी सदर तक्रारीची चौकशी करण्यात आलेली असून दि. २९.११.२०२१ रोजी म्हणजे सुनावणीच्या दिवशी चौकशी अहवाल उपलब्ध असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. त्यानुसार अपिलार्थी, श्री. भगत यांनी चौकशी अहवालाची एकूण १० पृष्ठांची माहिती देण्यात आली व अपील अर्ज निकाली काढण्यात आला असल्याचे नमूद केले आहे. अपिलकर्ता, श्री. संजय भगत यांनी जोडपत्र क नुसार दिलेली माहिती ही माहिती अर्जात नमूद विषयाशी संबंधित नसून दिशाभूल करणारी व चुकीची माहिती दिल्याचा आक्षेप नोंदविला आहे. या प्रकरणी अपिलार्थी, श्री. भगत यांच्यावतीने सुनावणीदरम्यान करण्यात आलेल्या मौखिक व लेखी युक्तीवादानुसार वरील अहवालात नमूद अनेक बाबी या दिशाभूल करणाऱ्या, खोट्या व चुकीचे काम करणाऱ्यांची पाठराखण करणाऱ्या असल्याची तसेच ग्रामसभेत झालेली कथित अनियमिततेवर पांघरून टाकणारी असल्याचे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी दाखल केलेला माहिती अर्ज हा त्यांच्या दि. ३०.०३.२०२१ रोजी केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने करण्यात आलेला चौकशी अहवाल कार्यवाही संबंधी असून यात कलम २ (च) प्रमाणे अभिलेखावर

उपलब्ध असलेली माहिती अपिलकर्ता यांना प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीदरम्यानच प्रदान करण्यात आली असून यातील माहितीशी ते असहमत असल्यास अथवा त्यातील काढलेले निष्कर्ष हे त्यांच्या म्हणण्यानुसार परस्पर विसंगत असल्यास त्याबाबत योग्य त्या न्यायिक प्राधिकरणाकडे दाद मागण्याच्या सुचनेसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

<u>**आदेश**</u>

**उपरोक्त आदेशाच्या अधीन राहून, प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १२.०३.२०२४**

जावक क्रमांक ----------E60E----------दिनांक --10 SEP 2024------------

c:\users\rma\desktop\prajakta\appeal order\12.3.2024\310-2022.docx